# जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार

गौण खनिज शाखा

☎ (02564)210011 Email id : miningndb@gmail.com FAX: (02564)210041

**रेती/वाळू घाट निर्गतीकरीता ई-टेंडरींग/ई-ऑक्शन फेर लिलाव क्रमांक 3 2016-2017 ची अधिसुचना**

क्रमांक/2017/गौखनि/कावि/५२ नंदुरबार दिनांक : १९ /01/2017

मुंबई गौणखनिज उत्खनन नियम 1955 मधील नियम 39(ए), महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-गौखनि-10/0512/प्र.क्र.300/ख दिनांक 12 मार्च, 2013 चे शासन निर्णयानुसार व दिनांक 06/10/2016 रोजीच्या जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समितीच्या मान्यतेमधील अटी व शर्तीस अधीन राहून तसेच जिल्हास्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन समितीने मान्यतेच्या अटी व शर्तीस अधीन राहून नंदुरबार जिल्ह्यातील 03 वाळु घाटाची ऑनलाईन ई-निवीदा व ई-ऑक्शनव्दारे लिलाव प्रक्रिया पुर्ण करण्यात आलेला आहे. मात्र शहादा तालुक्यातील 03 वाळु घाट व नवापूर तालुक्यातील 01 वाळुघाट पहिल्या प्रक्रियेनंतर दोनदा फेर लिलाव करूनही कोणत्याही लिलावधारकाने ई-निवीदा व ई-ऑक्शनमध्ये भाग घेतलेल्या नसल्याने सदरच्या वाळूघाटांचा लिलाव झालेला नाही. म्हणुन सदर वाळु घाटांच्या हातची किंमत कमी करून मा. आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक.मशा/कार्या/2/जमिन/1/2882/2017 जा.क्र. 27481 दिनांक 16/01/2017 नुसार हातच्या किमंतीस (Upset Price) कमी करुन मंजुरी मिळाल्याने दिनांक 30 सप्टेंबर, 2017 अखेरच्या कालावधीकरीता ई निविदा व ई ऑक्शनद्वारे करण्यात येत आहेत. जाहीर लिलावासंबंधी सर्व माहिती, वाळू लिलावाच्या अटी, शर्ती, वाळू गटाची शासकीय किंमत व इतर सर्व माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, (www.nandurbar.nic.in) गौणखनिज शाखा, नंदुरबार व जिल्ह्यातील सर्व तहसिलदार/उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय येथे व https://eauctioncollnan.abcprocure.com या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्यात आलेली आहे. इच्छूक व्यक्तीस/ संस्थेस/ लिलावधारकांना/ कंत्राटधारकांना/कंत्राटदारांना या लिलावात भाग घेण्याकरिता विनंती करण्यात येत आहे.

ई-निविदा व ई-ऑक्शन प्रक्रीयेत भाग घेणाऱ्या सर्वांना ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे आवश्यक राहील. ऑनलाईन नोंदणी करीता (Registration) पुढील माहिती व कागदपत्राची सांक्षांकित प्रती इच्छूक निविदाधारकास बंधनकारक आहे. (1) ई-मेल आयडी (2) पॅनकार्ड व आधार कार्ड (3) टिन नंबर (कपनी असल्यास) (4) मागील तीन वर्षाचे आयकर विवरण पत्र (सन-2013-14, 2014-15 व 2015-16) (5) निविदेतील अटी शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्र अनिवार्य आहे.

ई-निविदा/ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यास पुढील प्रमाणे ना-परतावा फी अदा कराव्या लागतील.(1) निविदा फॉर्म फी प्रत्येक वाळू स्थळाकरीता स्वतंत्र रुपये 5000 (अपसेट प्राईस दहा लाखापेक्षा जास्त असणाऱ्या वाळू स्थळासाठी) व ज्या वाळु गटाची हातची किंमत रु.10 लाख व त्यापेक्षा कमी असेल अशा वाळु गटासाठी अर्जाचे शुल्क रु.2000/- भरावे लागेल. (2) ज्या रेती घाटासाठी ई-निविदा प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्यासाठी अनामत रक्कम (EMD) म्हणून वाळू घाटाच्या हातच्या किमतीच्या 20% टक्के रक्कम जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी ठरवून दिलेल्या खात्यावर जमा करावी लागेल. (3) ई-निविदा नेट बँकिंग/क्रेडीट कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने वेबसाईट वरून (संकेतस्थळावरून) डाऊनलोड करून खरेदी करावे लागेल त्याकरीता नोंदणी खर्च रूपये 2875/- व निविदा प्रक्रिया फी रूपये 1553/- अशी रक्कम जमा करावी लागेल.

जी व्यक्ती/संस्था ज्या वाळू गटाकरीता ई-निविदा भरेल, अशाच व्यक्ती/संस्थांना ई-ऑक्शन मध्ये भाग घेता येईल. ई-निविदाही ई-ऑक्शन झाल्यानंतर खुली करण्यात येणार आहे. या दोन्ही प्रकारच्या म्हणजेच निविदा आणि लिलाव यापैकी ज्यामध्ये सर्वाधिक दर नमुद असतील त्या ठेकेदारास लिलाव देण्यात येईल.

ई-टेंडरींग/(ई-निविदा) व ई-ऑक्शन(ई-लिलाव) पद्धतीने लिलाव करावयाचा वाळू गटाचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | दि.20/01/2017 | ई-लिलाव सुचना प्रसिध्दी |
| 2 | दिनांक 20/01/2017 ते दिनांक 31/01/2017 | दिनांक 20/01/2017 (शुक्रवार) सकाळी 10.00 वा. पासून नोंदणी (Registration) ऑनलाईन पद्धतीने (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. ती दिनांक 31/01/2017 (मंगळवार) पर्यंत सायंकाळी 6.00 पर्यंत सुरु राहील. यानंतर संगणकीय नोंदणी बंद होईल. नोंदणी केलेल्या व्यक्ती संस्थांनी दिनांक 20/01/2017 (शुक्रवार) ते 31/01/2017 (मंगळवार) या कालावधीत सकाळी 10.00 वा.पासून ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत निवासी उपजिल्हाधिकारी नंदुरबार यांचे कार्यालय येथे संगणकीय नोंदणीत दाखल केलेले सर्व कागदपत्रे प्रत्यक्षात सादर करुन नोंदणी मान्य करुन घेणे.। |
| 3 | दिनांक 20/01/2017 ते दिनांक 02/02/2017 | दिनांक 20/01/2017 (शुक्रवार) ते 02/02/2017 (गुरुवार) या कालावधीत सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 वाजेपावेतो ई-निविदा व ई-ऑक्शनसाठी भाग घेणाऱ्या लिलावधारकांना वाळु/रेती घाटाची 20% अनामत रक्कम जमा करणे. |
| 4 | दिनांक 20/01/2017 ते दिनांक 02/02/2017 | दिनांक 20/01/2017 (शुक्रवार) ते दिनांक 02/02/2017 (गुरुवार) दररोज सकाळी 10.00 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत निविदा ऑनलाईन पद्धतीने (संगणकीय पद्धतीने) जमा करणे. |
| 5 | दिनांक 03/02/2017 | दिनांक 03/02/2017 (शुक्रवार) सकाळी 11.00 वा.पासून ई-निविदा भरलेल्या निविदा धारकांना ई-ऑक्शनसाठी ऑनलाईन पद्धतीने संगणकीय प्रणालीमध्ये वेबसाईटवर खुली करुन देण्यात येईल. |
| 6 | दिनांक 04/02/2017 | दिनांक 04/02/2017 (शनिवार) सकाळी 8.00 ते सायं. 5.00 पर्यंत ई-ऑक्शन ऑनलाईन सुरु राहील. वेळ समाप्ती वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी 10 मिनिटे प्रमाणे 3 (तीन) वेळा वाढ करण्यात येईल. त्यानंतर ई-ऑक्शन करता वेळ वाढवून दिला जाणार नाही. |
| 7 | दिनांक 04/02/2017 | दिनांक 04/02/2017 (शनिवार) सायंकाळी 06.00 वा.पासून पुढे जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथे ई-ऑक्शन बाबतचा अंतिम निर्णय. |

सर्वोच्च ई-ऑक्शनधारकास (ई-लिलावधारकास) / ई-टेंडरधारकास (ई-निविदा) आलेल्या सर्वोच्च ई-बोलीनुसार वाळू स्थळ मंजूर करण्यात येईल. ज्यांच्या नावे लिलाव कायम होईल. लिलाव कायम केल्यावर लिलावधारकांना शासन निर्णय दिनांक 12/03/2013 च्या सर्व अटी व जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन पर्यावरण समितीच्या मान्यतेमधील अटी व शर्तीस अधीन राहून तसेच जिल्हास्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन समितीने च्या बैठकीतील सर्व अटी लागू राहतील.

**ई-टेंडरींग (ई-निविदा) अथवा ई-ऑक्शन (ई-लिलाव) स्विकारण्याचे वा नाकारण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी राखून ठेवलेले आहेत.**

नोंदणी (Registration), ई-टेंडरींग (ई-निविदा), ई-ऑक्शन (ई-लिलाव), मध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यास संपर्क दूरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत. 91-79-400 16 835 | 837 | 867 | 802 | 879 | 886 | 865 | 883 | 852 | 823 | 891 E-Mail : rahul.desai@ProcureTiger.com

(अनिल पाटील)

**अपर जिल्हाधिकारी नंदुरबार**

# जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार

➢ **वाळू लिलाव धारकासाठी सर्वसाधारण निर्देश, अटी व शर्ती**

1. वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा अधिक बोलीने ई-(ऑक्शनव्दारे) भरून लिलावाला सुरूवात करण्यात येईल.
2. ई-टेंडर/ई-ऑक्शनव्दारे लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास, विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरून त्या वाळू गटाचा 10 दिवसाचे आत फेरलिलाव करण्यात येईल.
3. ई-टेंडर/ई-ऑक्शनव्दारे लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणून रूपये 3,00,000/- (रूपये तीन लक्ष फक्त)किंवा अपसेट प्राईसच्या 20% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम म्हणून रोखीने भरावी लागेल.परंतू ज्या वाळू गटाची हातची किंमत रूपये 10 लाखपेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या 20% अनामत रक्कम रोखीने भरावी लागेल.ज्या लिलावधारकाची अत्युच्चबोली/निविदा स्विकारण्यात येईल,त्याची रक्कम नियमानूसार त्याने भरावयाच्या बोलीच्या 1/4 रकमेत समायोजीत करण्यात येईल.ज्या लिलावधारकाची बोली /निविदा स्विकारण्यात येणार नाहीत ,त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येतील.
4. लिलावाने घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळू साठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घेण्याची जबाबदारी संबधित लिलावधारकाची राहील.त्यानंतर याबद्दल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.
5. ई-टेंडर/ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांचा राहील व सदर निर्णय लिलावाच्या दिवशी कळविण्यात येईल.
6. ई-टेंडर /ई-ऑक्शन मधील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर व 1/4 रक्कम भरल्यानंतर 15 दिवसात बोलीची उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतच्या हमीचे दायीत्व स्वीकारणाऱ्या दोन व्यक्तीसह स्वखर्चाने खरेदी केलेल्या रूपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) त्वरीत करारनामा करून देईल. असे करारपत्र करून न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित रेती/वाळू गटाचा फेरलिलाव करण्यात येईल.तसेच विहित कालावधीत वरीलप्रमाणे करारपत्र न केल्यास परिणामी लिलावधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रक्कमेपैकी अ.क्र 3 प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली 75% रक्कम सर्वोच्च ई-निविदा/ई-लिलाव स्विकारल्यापासून 15 दिवसात एक रकमी भरावी लागेल.लिलावधारकांने शिल्लक राहीलेली 75% रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर,त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशिरात उशीरा 7 दिवसात देण्यात येईल.
7. ज्यावेळी रेती /वाळू ठेका लिलाव रद्द कृरण्यात येईल, अशा वेळेस त्या रेती /वाळू क्षेत्राचा नव्याने ई-निविदा /ई-ऑक्शन पध्दतीने फेरलिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेर लिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.
8. लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/ वाळू काढण्याने जमीनीची धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतीना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल, अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांचे निर्णय अंतिम असतील.

9. विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही.तसेच इतर व्यक्तीच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती/वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते/पायवाटा म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून रेती /वाळू काढता येणार नाही.

10. कोणत्याही रेल्वेच्या पूलाच्या कोणत्याही बाजूने 600 मिटर्स (2000 फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही.तसेच जेथे नदी-नाल्यांवर पूल आहेत,त्यांच्या स्तंभापासून 100 मीटर्स रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रामध्ये रेती/वाळू चे उत्खनन करता येणार नाही.

11. जेथे वाळू उत्खनन चालू आहे, त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करून दर्शविणेत यावी.

12. वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतेही हानी / नूकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची /नूकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यांत येईल व त्या बाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहिल व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे संबंधित लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

13. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा वाळू/रेती काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. लिलावधारकास कोणत्याही वैध कारणामुळे ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध यांमुळे उत्खननास किंवा वाहतूकीस बाधा आल्यास किंवा वाळूगटाचा ताबा न दिल्यास, लिलावाची मुदत संपण्यापूर्वी, ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल, त्या कालावधीसाठी,त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल.अशी रक्कम परत करताना लिलावाची देकाराची रक्कम लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानूसार परताव्याच्या रक्कमेची परिगणना करण्यात येईल.

14. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकाऱ्याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा /रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरून हलविण्यात आला नाही, तर तो शासनाच्या मालकीचा होईल.अशा वाळूच्या/रेतीच्या किमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरूध्द दावा करता येणार नाही.तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर, कोणत्याही परिस्थितीत वाळू /रेती साठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस देण्यात येणार नाहीत.

15. लिलावधारकास वाळूची /रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था /संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.

16. लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर इत्यादी विहीत केल्याप्रमाणे अदा करावेत.

17. लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या /मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे सिमेंट (R.C.C.) चे पुरेशा लांबीचे खांब उभारावे.

18. लिलावधारकास वाळूसाठाचा ताबा दणेपुर्वी नदीचे काठालगतचे जमीनीचे पातळीपासून (Ground Level) मंजूर केलेल्या वाळूस्थळाची पातळी (Level) किती मीटर खाली आहे हे बांबूचे / लोखंडी रॉडचे सहाय्याने मोजून घेवून त्या पातळीचे खाली 2 मी. पर्यंत उत्खनन अनुज्ञेय असेल. त्यासाठी लिलावधारकास मंजूर

वाळु स्थळाचे पातळीत (Level) बेंच मार्क निश्चीत करुन देण्यात येईल. यासाठी येणारा खर्च हा लिलावधारकाने सोसावयाचा आहे.

19. लिलाव घेण्याची तारीख कोणतीही असली तरी लिलावाचा कालावधी 30 सप्टेबर 2017 रोजीच संपुष्टात येईल. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्याने वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू गट बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

20. उत्खनन केलेल्या वाळूच्या/रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करून दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही. अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

21. नदीपात्रातून/नाल्यातून अथवा त्याला रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी त्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

22. रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येउ नये. नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

23. लिलावधारकाने गावकऱ्याच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

24. रेती /वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात दयावी.

25. वाळु /रेती वाहतूकीसाठी महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभागाचे परिपत्रक दि. 02 फेब्रुवारी 2016 व त्यालगत केंद्र शासन, पर्यावरण विभाग यांचेकडील दि. 15 जोनवारी 2016 पासनू बारकोड प्रणाली लागु करण्यात आलेली असल्याने बारकोडयुक्त पावती पुस्तके असणेय अनिवार्य आहे.

26. सदर प्रणालीनूसार लिलावधारकास त्याचे 3 मोबाईल नंबर रजिस्टर करणे बंधनकारक राहील.

27. लिलावधारक निर्धारित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करून प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक,वाळूगटाचे नाव/क्रमांक,वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादी तपशिल नोंदणीकृत मोबाईलवरून एसएमएसव्दारे (SMS) निर्दिष्ट क्रंमाकावर कळविल. प्रणालीकडून लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनूसार त्यास एसएमएसव्दारे टोकन नंबर प्राप्त होईल. असा Invoice No. प्राप्त झाल्याशिवाय लिलावधारकास वाळू/रेतीची वाळतूक करता येणार नाही.टोकन बारकोड पावती व त्यामधील Invoice No. शिवाय वाहतूक केल्यास ती अवैध ठरवून त्यावर प्रचलित कायदे व धोरणानूसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

28. वाळू/रेती वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडुन केले जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनलचालकाकडे असणाऱ्या पावतीत वैध बारकोड पावती आढळली नाह किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याचेविरध्द महाराष्ट्र जमिन महसूल संहिता 1966 मधील कलम 48 (7) व (8), महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनयिमन) नियम, 2013 आणि संदर्भाधिन दिनांक 12.03.2013 च्या महसूल व वनविभाग शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्यांचेविरध्द कारवाई करण्यात येईल.

29. वाळू/रेती लिलावधारकाने नोंदणीकृत मोबाईलवरून एसएमएसव्दारे प्रणालीस कळविलेल्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायदयानूसार कारवाई करण्यात येईल.दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करून दयावीत.

30. गौणखनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावाने/परवानाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबंधित महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांच्या निरिक्षणाकरीता उपलब्ध करून दयावीत.

31. लिलावधारकाने रेती/वाळु वाहतुक करणाऱ्या वाहनांचे नोंदणी क्रमांक तसेच वाहन क्रमांक व सदर वाहनातून किती रेती/वाळु वहन (ब्रासमध्ये) करणार आहेत याची (वहन क्षमता) माहिती लिलाव घेतल्यानंतर 07 दिवसाच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयात देणे बंधनकारक राहील. याशिवाय ज्या-ज्यावेळी इतर वाहनातून वाळु/रेतीची वाहतूक करणार असतील अशा वेळी सदर वाहनांची माहिती तात्काळ इकडील कार्यालयात परवानगीसाठी देण्यात यावी. सदर वाहनातून विनापरवानगी वाहतूक करता येणार नाही.

32. लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रूपये 3,00,000/- (रूपये तीन लाख फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20 टक्के यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत म्हणून विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे.परंतू त्या वाळू गटाची हातची किंमत रू 10 लाखापेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या 20% रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. हि रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशत: अथवा पुर्णत: जप्त करण्यात येईल.

33. लिलावधारकांने नियमात नमूद केलेप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदीनूसार असलेले नियम (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदी नुसार तसेच अन्य कायदे /नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा /वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणून केला पाहिजे.

34. लिलावधारक/परवानाधारक यांना पर्यावरण विषयक अटी व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदीचे पालन करणे बंधनकारक आहे.

35. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे किंवा इतर बंधारे/बांध असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

36. सार्वजनीक पाणवठा /पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलीकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

37. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करूनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूकन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

38. अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळू साठा रेतीगटास असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

39. अवैध वाळू/रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 मधील 48 (7) व (8) नूसार तसेच इतर लागू होणाऱ्या सर्व कायदे व नियमानूसार कारवाई करण्यात येईल.

40. लिलाव मंजूर करणेत आलेल्या वाळू गटांना वाळु उत्खननाकरिता संक्शन पंपाचा वापर करावा लागेल अशा वाळू गटांना भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची व शासनाची परवानगी मिळाल्यानंतर रितसर परवानगी देणेत येईल.

41. ई-टेंडर /ई-ऑक्शन मध्ये भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती/संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.

## <u>पर्यावरण विषयक अटी व शर्ती</u>

*a.* निविदाधारकाने/ लिलावधारकाने सदर क्षेत्राचे भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (GSDA) यांचेमार्फत सर्वेक्षण करुन किती प्रमाणात, किती काळापर्यंत रेती उत्खनन करावे याचे प्रमाणपत्र घ्यावे व त्याची एक प्रत इकडेस उपलब्ध करुन द्यावी.

*b.* रेती उत्खनन करताना आजुबाजूचे विद्युत मनोरे, जलवाहिन्या, रेल्वे पूल इत्यादी राष्ट्रीय संपत्तीला व अतिमहत्वाच्या ठिकाणांना तसेच संवेदनशिल क्षेत्राला कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी. अशा प्रकाराचा धोका निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक / लिलावधारकावर राहिल व यासंदर्भात त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

*c.* विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांनी नमूद केलेल्या सर्व अटींचे पालन करणे निविदाधारकास / लिलावधारकास बंधनकारक राहिल. अन्यथा त्यांची लिलाव प्रक्रिया रद्द करण्यात येईल.

*d.* पर्यावरण संरक्षण कायद्यातील तरतुदींचा भंग झाल्यास पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत उत्खननाची देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

*e.* यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

*f.* रेती उत्खननाच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता संबंधित निविदाधारकाने/ लिलावधारकाने घ्यावी.

*g.* पर्यावरणाचे संतूलन राखण्यासाठी निकामी रेती / वाळूचे साचलेले ढीग परत नदीचे पात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. याबद्दल संपूर्ण जबाबदारी निविदाधारक/ लिलावधारक यांची राहील.

*h.* निविदाधारक / लिलावधारक यांनी ठेका मंजूर झालेवर संक्शन पंपाव्दारे करण्यात येणा-या वाळू उत्खननासाठी शासनाची पर्यावरण अनुमती तसेच, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी अनुमती / संमतीपत्र न घेताच संक्शन पंपाव्दारे रेती/वाळु उत्खनन केल्यास सदर बाब गंभीर समजून पर्यावरण सरंक्षककायदयातील तरतुदीचा भंग करणारी आहे. असे आढळून आलेस नियमानुसार आवश्यक ती कारवाई करणेत येईल.

*i.* सिलटेशन (siltation) स्टडीबाबतचा अहवाल रेती / वाळू उत्खननापुर्वी अथवा वाळू उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी, तज्ञ एजन्सी जसे NIO/ CWPRSकडून करुन त्याचा अहवाल पर्यावरण विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जळगांव यांचेकडेस सादर करावा लागेल.

*j.* ज्या ठिकाणी कासवांची घरटी (Turtle Nesting) असेल त्या ठिकाणाहून वाळू उत्खनन करण्यात येऊ नये.

*k.* मंजूर क्षेत्रापैकी कमीतकमी *20%* क्षेत्रामध्ये नदी तिरावर झाडे लावून हरीयाली (Green Belt)करावी लागेल.उत्खननाच्या वेळी Soil erosion वSilt managemnetच्या बाबत आवश्यक त्या दक्षता घेण्यात याव्यात.

*l.* उत्खननाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमिक उपचार सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागेल.

*m)* आवश्यकता भासल्यास उत्खननाच्या जागेवर मजुरांना जेवण बनविणे, शुध्द पाणी, वैद्यकीय उपचार व इतर सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल.

*n)* वार्षिक पर्यावरणीय अंकेक्षण अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा लागेल.

*o)* ई-निविदा / ई-लिलावधारकाने वाळू उत्खननाबाबतचा मासिक व सहामाही अहवाल झेरॉक्स प्रत व सिडि/ पेनड्राईव्ह मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, **MPCB Officeव** पर्यावरण विभागास सादर करावा लागेल.

42. लिलावधारकाने निविदा अधिसूचना, सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी व शर्तीचे पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करून घेतल्यानंतर पात्र लिलावधारकास वाळू गटाचा ताबा देण्यात येईल.
43. दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे जनहितास्तव कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.
44. शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.
45. वाळुचे उत्खनन केवळ सकाळी 06.00 ते सांयकाळी 06.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.
46. शासन निर्णय दिनांक 26 डिसेंबर 2014 अन्वये वाळु/रेती निर्गतीबाबत SMATS प्रणाली लागु करण्यात आलेली आहे. कोणतेही वाहन क्षमतेपेक्षा अधिक परिणामाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, तसेच सदर वाहनांवर मोटार कायद्यानुसार व अन्य कायद्यानुसार खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

   **अ.** सदर वाहनाचा वाहतूक परवाना पहिल्या गुन्ह्यासाठी 30 दिवस, दुसऱ्या गुन्ह्यासाठी 60 दिवस व तिसऱ्या गुन्ह्यासाठी 90 दिवस याप्रकारे निलंबित करण्यात येईल.

   **ब.** वाहन परवान्याबरोबर वाहन चालकाच्या लायसन्सवर मोटार कायद्यानुसार परिवहन विभागास प्राप्त अधिकारात सदर चालकाचे लायसन्स पहिल्या गुन्ह्याकरीता सहा महिन्यांकरीता निलंबित केले जाईल. अशाच प्रकारचा दुसरा गुन्हां करतांना एखादा वाहन चालक आढळल्यास त्याचे ड्रायव्हींग लायसन्स कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल.

47. आयकर / विक्रीकर अधिनियमातील तरतुदीनुसार लिलावाच्या उच्चतम रकमांचे अनुषंगाने विक्रीकर (TDS) 10 *टक्के* /आयकर (TCS) 2 टक्के देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस विक्रीकर व आयकर खात्यातर्फे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर व मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक राहील. सदरचे कर भरल्याशिवाय वाळू घाटाचा ताबा देण्यात येणार नाही.
48. लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस रुपये *5000/- (रुपये* पाच हजार) इतक्या रकमेचा संचालक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्या नावे काढण्यात आलेला धनाकर्ष ***(Demand* draft)** सर्वेक्षण शुल्कापोटी लिलावाच्या दिवशी जमा करावा लागेल.
49. लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस पर्यावरण शुल्कापोटी लिलावात गेलेल्या वाळूच्या स्वामित्वधनावरील मुल्याच्या *2%* रक्कम ही पर्यावरण शुल्क म्हणुन द्यावी लागेल.
50. केंद्रीय खनिकर्म मंत्रालयाचे दि.01.09.2016 च्या अधिसुचनेनुसार गौण खनिजाच्या संदर्भात लिलावात जाणा-या वाळु घाटाच्या किंमतीच्या 10% रक्कम ही जिल्हा खनिज प्रतिष्ठान या नावाने उघडण्यात

आलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा नंदुरबार या बँकेतील चालू खाते क्र.36129617308 या क्रमांकावर भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय वाळु गट लिलावधारकास मंजूर केला जाणार नाही.

51. शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव / ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

52. लिलावधारकास वाळू स्थळावर फ्लड लाईट लावणे आवश्यक राहील. ज्या वाळु घाटाजवळ फ्लड लाईट नसतील अशा लिलावधारकाचा ठेका रद्द करणेचे अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांचे असतील.

53. लिलावधारकास शासनाचे अस्तित्वात असलेले अधिनियम, नियम, तसेच वाळु उत्खननासंदर्भात असलेले शासन निर्णय, परिपत्रके यातील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

54. मंजूर वाळु घाटातील वाळु चोरी किंवा अवैध उत्खनन व वाहतुक थांबविणेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करणेचे अधिकार जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांना राहतील.

55. मंजूर करण्यात आलेल्या वाळु घाटातून उत्खनन केलेल्या वाळुची वाहतूक साधारणत: 02 ब्रास क्षमतेच्या वाहनातून करुन राज्य मार्ग ज्या ठिकाणाहून जातो त्या ठिकाणी वाळु साठा करुन राज्य मार्गावरुन वाळुची वाहतूक करणे अनिवार्य राहील.

56. वाळु लिलाव प्रक्रिया सुरु असताना किंवा त्यांनतर वाळु घाटासंदर्भात न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास इकडील कार्यालय जबाबदार राहणार नाही तसेच वाळु लिलावातील संपुर्ण रक्कम व इतर अनुषंगिक रकमा भरणे हे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

वरील पैकी कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम तसेच लिलावधारकांने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करून लिलाव रद्द करण्यात येईल आणि इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(अनिल पाटील)
**अपर जिल्हाधिकारी नंदुरबार**

| नंदुरबार जिल्हयातील सन 2016-2017 वाळु/रेती घाटांचे हातची किंमत दर्शविणारे विवरणपत्र | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | वाळू घाट क्रमांक वाळूघाटाचे नाव | तालुका | नदीचे नाव | गट नं. | सन 2016-2017 साठी प्रस्तावित क्षेत्र | | | | | सन 2016-17 साठी निर्धारित केलेली रक्कम (अपसेट प्राईस) | सन 2016-2017 साठी 25% कमी करुन सुधारीत केलेली रक्कम (अपसेट प्राईस) |
| | | | | | लांबी मी. | रुंदी मी. | खोली मी. | प्रतिब्रास किंमत स्थानिक दर | संभाव्य निघणारा वाळूसाठा (ब्रास) | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | 02. शेल्टी | शहादा | तापी | 20,19 | 255 | 60 | 2 | 1531 | 10813 | 16554703 | 12416027 |
| 2 | 03. ससदे | शहादा | तापी | 568,565 | 260 | 60 | 2 | 1531 | 11025 | 16879275 | 12659456 |
| 3 | 04. बिलाडी त.सा. | शहादा | तापी | 9 | 270 | 60 | 2 | 1531 | 11449 | 17528419 | 13146314 |
| 4 | 06. नवागाव | नवापूर | सरपणी | 2 | 66 | 23 | 2 | 1000 | 1073 | 1073000 | 804750 |

(अनिल पाटील)
अपर जिल्हाधिकारी नंदुरबार

यशस्वी निविदाधारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये 100/- चे मुद्रांकित स्टॅम्प पेपरवर दोन साक्षीदारांचे स्वाक्षरीसह द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

## प्रतिज्ञापत्र

मी नामे ( पूर्ण नांव)----------------------------------------------------------------------------------------------------
राहणार ( पोस्टाचा पूर्ण पत्ता द्यावा)-----------------------------------------------------------------------------------
तालुका------------------------ जिल्हा ------------------------ राज्य ---------------------------------------------
माझी /माझे संस्थेचे पॅन क्रमांक ----------------------------------- टिन क्रमांक-------------------------------------

मी प्रतिज्ञापुर्वक घोषित करितो की, मला रेती / वाळू घाटाच्या ई-निविदेतील सर्व अटी व शर्तीची जाणीव आहे. व मी ई निविदेत प्रस्तावित केलेल्या किंमतीत रेती घाट घेण्यास ईच्छुक असून अपसेट प्राईसच्या 20 % अनामत रक्कम मी शासन जमा करित आहे. मला सदर रेती/वाळू घाट मंजूर झाल्यास वाळु घाटाचा ताबा घेण्यापूर्वी लिलावाच्या देकाराची संपूर्ण रक्कम मी चलनाद्वारे भरणा करुन मंजुर रेती/वाळू घाटाचे निष्पादन करुन घेण्याचा हमी देत आहे. तसे न केल्यास मी जमा केलेली 20% रक्कम शासन जमा करण्यात यावी व नियमानुसार दुस-या यशस्वी निविदाकारास रेती घाट मंजूर केल्यास अथवा फेरनिविदाद्वारे विल्हेवाट केल्यास तसेच शासनास झालेल्या नुकसान जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल केल्यास माझी काहीच हरकत राहणार नाही याची मला जाणीव आहे. तसेच वाळु लिलाव प्रक्रिया सुरु असताना अथवा वाळु लिलाव प्रक्रियेनंतर मी घेतलेल्या वाळु घाटासंदर्भात न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास वाळु घाटाची संपुर्ण रक्कम भरणेची जबाबदारी माझी राहील तसेच याबाबत मी कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा रक्कम भरणेस नकार दिल्यास मी कारवाईस पात्र राहील.

मी असेही घोषीत करतो की सदरहू रेती/वाळू घाट आणि अनुमोदीत रस्त्याची मी पाहणी केली आहे. वाळूचा दर्जा,साठा व त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती / वाळू वाहतुकीसाठी योग्यते बाबत मी इतर कोणताही आक्षेप उपस्थित करुन वाद निर्माण करणार नाही. तसेच मी घेतलेल्या वाळु घाटावरील वाळु साठा हा नदी पात्रातील पाण्यात असल्यामुळे वाळु उत्खननाकरिता संक्शन पंपाचा वापर करण्याची परवानगी शासनाकडुन मिळाल्यानंतरच मी वाळु उत्खननास सुरुवात करेल.

टिकाण :- नंदुरबार
दिनांक :- / /2017

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

साक्षीदार

1.पुर्ण नाव ----------------------------------------------------- स्वाक्षरी --------------------
पत्ता-----------------------------------------------------------

2.पुर्ण नाव ----------------------------------------------------- स्वाक्षरी --------------------
पत्ता-----------------------------------------------------------